# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००००५१**

**अपिलार्थी श्री. विशाल विश्वास कांबळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
एच.आर.कॉलेज ऑफ कॉमर्स, के.एम.कुंदनी चौक,
१२३, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा रजिस्टार**
एच.आर.कॉलेज ऑफ कॉमर्स, के.एम.कुंदनी चौक,
१२३, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०२.२०२२**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०९.२०२० | - | ०२.११.२०२० | ०२.१२.२०२० |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०१.२०२१ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. १५.०९.२०२० अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

१) *"शासन निर्णय अल्पसंख्यांक विभाग क्र. २०१२/प्र.क्र. २१/ कार्या- ५, दि. २७.०५.२०१३ अन्वये आपल्या महाविद्यालयामध्ये प्रथम वर्षीय वाणिज्य शाखा व व्यवसायिक अभ्यासक्रमाचा तपशिल मिळणेबाबत.*

२) *आपल्या महाविद्यालयाअंतर्गत प्रथम वर्षीय वाणिज्य शाखा व व्यावसायिक अभ्यासक्रमाची जाहिरात वृत्तपत्रात दिलेली प्रत."*

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २४.११.२०२० व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०२.१२.२०२० संलग्न केलेले आहेत.

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००५१**

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे शेरे नोंदवून दि. ०२.१२.२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहे:-

1) *"The Appellant has filed eleven the First Appeal dated 02.11.2020 against RTI Application dated 15.09.2020.*
2) *A personal hearing of the appeals was given to the Appellant on 01.12.2020. The Appellant was present in person. The Respondent Mr. Navin Punjabi and his Advocate, Ashwin Jajal was present.*
3) *The Appellant submitted that he had filed the RTI Application all dated 15.09.2020 but has not received information.*
4) *The Respondent submitted that due to national lockdown he was unable to reply to the said RTI. The Respondent pointed out that the Appellant has not sought any specific information but wanted clarification as to whether the College has complied with the Government Order of Minority Development Department dated 27.05.2012, and therefore the information sought to be liked clarification cannot be furnished.*
5) *I agree with the submission of the Respondent that information sought is like clarification cannot be furnished. An information seeker is expected to ask for information not expected to seek clarification.*
6) *The Appeal is, therefore dismissed."*

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले की, प्रथम अपील अर्जावर वेळेत कार्यवाही करुन आदेश पारीत करण्यात आलेले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश योग्य आहेत. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २८.०२.२०२२**